**ठळक बातम्या**

- यंदाच्या रब्बी हंगामात देशात ३६२ दशलक्ष टनांहून अधिक अन्न-धान्य उत्पादनाचं लक्ष्य
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना मिळालेल्या भेटवस्तूंचा लिलाव सुरू, देशभरात सेवा पर्वानिमित्त उद्यापासून विविध उपक्रमांचं आयोजन
- राज्यातल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारीपर्यंत घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे राज्य निवडणूक आयोगाला निर्देश

आणि

- हॉलिवूडचे प्रसिद्ध अभिनेते, निर्माता आणि दिग्दर्शक रॉबर्ट रेडफोर्ड यांचं निधन

**<><><><>**

यंदाच्या रब्बी हंगामात ३६२ पूर्णांक ५० शतांश दशलक्ष टन अन्न-धान्य उत्पादनाचं लक्ष्य निर्धारित करण्यात आलं असल्याची घोषणा केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज दिल्ली इथं केली. विविध राज्यांच्या कृषी मंत्र्यांसोबत पार पडलेल्या रब्बी अभियान परिषदेनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. यंदाचं अन्न धान्य उत्पादनाचं लक्ष्य गेल्या वर्षी झालेल्या अन्न धान्य उत्पादनापेक्षा २ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांनी जास्त असल्याचं चौहान यांनी यावेळी अधोरेखित केलं. या उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या बियाणांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना भेटरूपाने मिळालेल्या १ हजार ३०० हून अधिक वस्तूंचा आजपासून ऑन लाईन पद्धतीनं लिलाव सुरू झाला. केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह यांनी आज नवी दिल्ली इथं याबाबत माहिती दिली. या लिलावातून उपलब्ध होणार निधी नमामी गंगे सारख्या सरकारी योजना राबवण्यासाठी खर्च केला जाणार आहे. यापूर्वी केलेल्या अशा प्रकारच्या लिलावांच्या माध्यमातून ५० कोटी रुपयांहून अधिक निधी जमा झाला असल्याचंही सिंह यांनी यावेळी स्पष्ट केलं.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्यातल्या सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये एक उद्यान विकसित करण्यात येणार असून या उद्यानांना नमो उद्यान असं नाव देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. प्रत्येक उद्यानासाठी १ कोटी रुपयांचा निधीही देण्यात येणार आहे. नव्याने विकसित झालेल्या या उद्यानांची विभागीय स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. त्या माध्यमातून प्रत्येक विभागातून ३ नगरपरिषद आणि नगरपंचायतींना बक्षिसं दिली जातील.

महसूल आणि वन विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत 'सेवा पंधरवडा' हे विशेष अभियान राबवणार आहे. उच्च आणि तंत्र शिक्षण विभागामार्फत राज्यातली सर्व विद्यापीठं आणि महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजन होईल. कौशल्य विकास विभाग राज्यातल्या साडेसातशे गावांमध्ये स्वच्छता अभियान राबवणार आहे. राज्यातल्या ४१९ शासकीय औद्योगिक संस्थांमधून हजारो विद्यार्थी एकत्र येऊन हे अभियान राबवतील. भाजपाकडून देशभरात आयोजित सेवा पंधरवड्यात १ लाख मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, नेत्र तपासणी, रुग्णांना चष्मे वाटप, मोदी विकास मॅरेथॉन, क्रीडा स्पर्धा असे विविध कार्यक्रम होणार आहेत. याशिवाय सरकारच्या प्रमुख योजना, पर्यावरणीय उपक्रम आणि उपेक्षित घटकांपर्यंत पोहोचण्यासाठीची धोरणं अधोरेखित करणारे कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

**<><><><>**

सेवा आणि सुशासन या तत्वांचं अनुसरण करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने अनेक योजना राबवल्या आहेत. हरित आणि स्वच्छ उर्जेच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय सौर आघाडीद्वारे भारताला सौर उर्जा क्षेत्रात महत्त्वाचं स्थान मिळण्यासाठी केलेल्या कामगिरीचा थोडक्यात आढावा आपण घेणार आहोत….

**- होल्ड.. कॅप्सूल - -**

**<><><><>**

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार पटकावणारा ‘चलो जीते है’ हा चित्रपट उद्यापासून २ ऑक्टोबरपर्यंत देशभरात पुनर्प्रदर्शित होणार असल्याची माहिती, माहिती आणि प्रसारण

मंत्रालयानं आज दिली. स्वामी विवेकानंदांच्या तत्त्वांनी प्रेरित झालेल्या नरू या लहान मुलाची कहाणी हा चित्रपट सांगतो. देशभरातली जवळपास ५०० चित्रपटगृहं आणि शाळांमध्ये हा चित्रपट दाखवला जाणार असून त्यानंतर समाजासाठी काम करणारे सुरक्षारक्षक, स्वच्छता कर्मचारी, चालक, मदतनीस अशा कर्मचाऱ्यांचा सत्कारही होणार असल्याचं मंत्रालयानं सांगितलं.

**<><><><>**

राज्यातल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज राज्य निवडणूक आयोगाला दिले. यापुढे यासाठी आणखी मुदतवाढ दिली जाणार नाही, असंही न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठानं स्पष्ट केलं. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**-- होल्ड निवडणूक व्हाइस कास्ट- - -**

*(स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं ६ मे रोजी ठरवून दिलेली चार महिन्यांची कालमर्यादा न पाळल्याबद्दल न्यायालयानं आज राज्य निवडणूक आयोगावर ताशेरे ओढले. प्रभाग पुनर्रचनेची प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावी, निवडणुकीसाठी लागणाऱ्या मनुष्यबळाचे तपशील दोन आठवड्यांच्या आत राज्याच्या मुख्य सचिवांकडे सादर करावेत, तसंच ईव्हीएम्सची कमतरता दूर करून त्याबाबतचं कार्यपूर्ती शपथपत्र ३० नोव्हेंबरपर्यंत सादर करावं, असे निर्देशही न्यायालयानं आयोगाला दिले.)*

**<><><><>**

महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी धोरण २०२५ आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जाहीर करण्यात आलं. या धोरणात सन २०५० पर्यंतचं नियोजन असून सुमारे ३ हजार २६८ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे.

**<><><><>**

जीएसटी परिषदेनं अनेक वस्तूंवरचा कर कमी केला आहे. त्यामुळं शेतीसाठी लागणाऱ्या अनेक वस्तू स्वस्त होणार आहेत. ऐकूया त्याविषयी अधिक माहिती…

**-- होल्ड- व्हॉईस कास्ट- - -**

*(ट्रॅक्टर्स, कापणी यंत्र, आणि कंपोस्टींग यंत्रासारख्या उपकरणांवरचा जीएसटी १२ टक्क्यांवरुन ५ टक्के झाला आहे. ट्रॅक्टरच्या सुट्या भागांवर पूर्वी १८ टक्के कर होता. तो आता ५ टक्के झाला आहे. यामुळे या वस्तू शेकऱ्यांच्या आवाक्यात येतील आणि कृषी उत्पादन वाढीला प्रोत्साहन मिळेल अशी अपेक्षा आहे.)*

जीएसटीचे नवीन दर येत्या सोमवारपासून लागू होणार आहेत.

**<><><><>**

दोन्ही देशांना फायदेशीर ठरेल असा व्यापार करार लवकरात लवकर अंतिम करण्याचा निर्धार भारत आणि अमेरिका यांनी व्यक्त केला आहे. या व्यापार कराराच्या चर्चेसाठी अमेरिकेचं शिष्टमंडळ भारतात दाखल झालं आहे. व्यापार मंत्रालयातले विशेष सचिव राजेश अग्रवाल आणि अमेरिकेच्या शिष्टमंडळाचे प्रमुख ब्रेंडन लिंच यांनी आज नवी दिल्लीत चर्चा केली.

**<><><><>**

हॉलिवूडचे प्रसिद्ध अभिनेते, निर्माता आणि दिग्दर्शक रॉबर्ट रेडफोर्ड यांचं आज पश्चिम अमेरिकेतल्या युटा इथल्या त्यांच्या घरी निधन झालं. ते ८९ वर्षांचे होते.

‘Butch Cassidy and the Sundance Kid’, ‘The Sting’ आणि ‘All the President’s Men’ या क्लासिक चित्रपटांमध्ये रेडफोर्ड यांनी साकारलेल्या भूमिकांनी प्रेक्षकांची मनं जिंकली होती. १९८० साली ‘Ordinary People’ या चित्रपटासाठी सर्वोत्तम दिग्दर्शनासाठीचा ऑस्कर पुरस्कार त्यांना मिळाला होता. तर २००२ मध्ये ऑस्कर अकादमीकडून मानद जीवनगौरव पुरस्कारानं सन्मानित केलं होतं.

**<><><><>**

मॉरिशसचे प्रधानमंत्री डॉ. नवीनचंद्र रामगुलाम यांनी आज नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. त्यांचं स्वागत करताना राष्ट्रपती म्हणाल्या की भारताच्या शेजारी देशांप्रतिच्या धोरणात मॉरिशसचं स्थान खास आहे. दोन्ही देशांमधले संबंध अधिकाधिक दृढ होत असून ते धोरणात्मक भागिदारीत प्रतिबिंबित होत आहेत असं त्या म्हणाल्या. उभय नेत्यांमधे विविध विषयांवर चर्चा झाली.

**//<><><><>//**